दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र |सोमवार ,16 मार्च 2026 | |अंक क्र. 296 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com



''आपल्या माणसांसाठी आपल्या चवीचं हॉटेल''

हॉटेल बालाजी

ब्रम्हवाडी फाटा, बीड रोड, परळी वै.







# मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजना यशस्वीपणे राबविणाऱ्यांचा जाहीर सत्कार करणार - आ. धनंजय मुंडे

## परळी मतदारसंघातील शेत/पाणंद रस्ते योजनेचा धनंजय मुंडे यांनी घेतला आढावा

**परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)**

मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना उत्पादित शेतीमालाला ताजी बाजारपेठ मिळवून देण्यासह स्थानिक दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. या योजनेतून परळी मतदारसंघातील प्रत्येक शेत / पाणंद पक्क्या रस्त्याने जोडण्याचे आपले उद्दीष्ट असून, यासाठी मनरेगासह जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून जास्तीत जास्त कामे प्रस्तावित केली जावीत. या निधी बरोबरच विविध कंपन्यांच्या सीएसआर फंडातून देखील निधी उपलब्ध करून देण्यासाठी मी प्रयत्नशील असून, ही योजना 100% यशस्वीपणे राबवणाऱ्या ग्रामपंचायती तसेच प्रशासनातील अधिकाऱ्यांचा आपण जाहीर सत्कार करणार असल्याची भावना माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी आज परळी येथील एका बैठकीत बोलून दाखवली.

परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघातील मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेतून प्रस्तावित कामांचा धनंजय मुंडे यांनी आज संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसह प्रमुख पदाधिकारी व विविध गावच्या सरपंच, उपसरपंच आदींच्या उपस्थितीत सविस्तर आढावा घेऊन व्यापक चर्चा केली. शेत / पाणंद रस्त्यांच्या प्रस्तावित कामांमध्ये ज्या ठिकाणी अतिक्रमणे किंवा अपिल आहेत अशी प्रकरणे तातडीने सोडवावीत यासाठी एक विशेष कृती कार्यक्रम तयार करावा, तसेच अडचणीची अपिले किंवा अतिक्रमणे निकाली काढण्यासाठी आवश्यक तिथे आपणही स्थानिक ग्रामस्थांच्या मध्यस्थीने मदत करू, असेही धनंजय मुंडे या बैठकीत म्हणाले.


प्रत्येक गावातील कामे प्रस्तावित करताना संबंधित गावचे सरपंच तसेच प्रतिनिधींच्या सूचना विचारात घ्याव्यात अशा सूचनाही धनंजय मुंडे यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर आबा चव्हाण, जिल्हा परिषदेचे माजी गटनेते अजय मुंडे, बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, शिवाजीराव शिरसाट, राजाभाऊ पोळ, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, प्र. तहसीलदार विलास तरंगे, गटविकास अधिकारी राजवर्धन भोसले यांसह विविध गावचे सरपंच, पदाधिकारी तसेच संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

## जास्तीत जास्त कामे प्रस्तावित करा, अतिक्रमणे आणि अपिलांची प्रकरणे सोडवण्यासाठी मिळून प्रयत्न करा – धनंजय मुंडे यांचे आवाहन

# परळीत मध्यरात्री गजबजलेल्या भागात भीषण आग!

## परळीतील हनुमान चौकात असणाऱ्या शौर्य पेट्रोल पंपामागील बंगल्याला भीषण आग लागली ; कारण अस्पष्ट

## प्रशासनाचे शर्थीचे प्रयत्न; तासाभराच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश



**परळी (प्रतिनिधी)**

परळी शहराच्या महत्वपूर्ण ठिकाणी असलेल्या आणि अत्यंत गजबजलेल्या हनुमान चौक परिसरात मध्यरात्री भीषण आगीची घटना घडली. येथील 'शौर्य पेट्रोल पंपा'च्या ठीक पाठीमागे असलेल्या विद्यानगर भागातील एका प्रतिष्ठित नागरिकाच्या बंगल्याला अचानक भीषण आग लागली. पेट्रोल पंप अगदीच जवळ असल्याने शहरात मोठी दुर्घटना घडली, मात्र प्रशासन आणि स्थानिकांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, हा बंगला परळीतील प्रतिष्ठित नागरिक अरुण टाक यांचा असल्याची प्राथमिक माहिती आहे. मध्यरात्रीच्या सुमारास बंगल्यातून अचानक आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोट बाहेर पडताना दिसले. पाहता पाहता आगीने रौद्र रूप धारण केले. आग एवढी भीषण होती की, तिच्या ज्वाळा दूरवरून दिसून येत होत्या, ज्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.

पेट्रोल पंप जवळ असल्याने मोठी भीती निर्माण झाली होती कारण आग लागलेला बंगला आणि शौर्य पेट्रोल पंप यामध्ये अत्यंत कमी अंतर आहे. याची दखल घेत पोलीस नगरपरिषद प्रशासनाने तातडीने धाव घेतली. मोठी दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने युध्दस्तरावर पावले उचलली आणि पेट्रोल पंप परिसराची सुरक्षा सुनिश्चित केली.

■ **प्रशासनाचे शर्थीचे प्रयत्न -**

अग्निशमन दलाची वाहने घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच परिसरातील स्थानिक नागरिकांनी मदतकार्य सुरू केले होते. आगीची भीषणता पाहून अनेकांनी उपलब्ध साधनांच्या मदतीने आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने पाचारण करण्यात आल्या. अग्निशमन दलाचे जवान, पोलीस कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने आग विझवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू झाले. तासाभराच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले.

■ **बंगल्याचे मोठे नुकसान; कारण अस्पष्ट?**

पोलीस प्रशासनाने तातडीने चोख बंदोबस्त तैनात केल्यामुळे आणि जमावाला नियंत्रित ठेवल्यामुळे मदतकार्यात कोणताही अडथळा आला नाही आणि परिस्थिती नियंत्रणात राहिली. मात्र, या भीषण आगीत संबंधित बंगल्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. घरगुती सामान, फर्निचर आणि वास्तूचे मोठे नुकसान झाले असून नुकसानीचा नेमका आकडा आग पूर्णपणे आटोक्यात आल्यानंतर स्पष्ट होईल.

दरम्यान, ही आग नेमकी शॉर्ट सर्किटमुळे लागली की अन्य काही कारणामुळे, हे अद्याप स्पष्ट होऊ शकले नाही. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# कु.अवनी मोगरकरचे ऑलिम्पियाड परीक्षेत यश

**परळी (प्रतिनिधी)**



परळी शहरातील गणेशपार भागातील ज्ञानबोधिनी विद्यालयाची विद्यार्थिनी कु.अवनी अश्विन मोगरकर हीने ऑलिम्पियाड परिक्षेत सुवर्णपदक मिळवत यश संपादन केले आहे.कु.अवनी ही नगरसेविका सौ.जयश्री मोगरकर यांची नात आहे.

इयत्ता १ ली ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या ऑलिपियाड स्पर्धात्मक परीक्षा आहेत. या परीक्षा गणित, विज्ञान,इंग्रजी आणि तर्कशक्ती यांसारख्या विषयांमधील विद्यार्थ्यांचे सखोल ज्ञान आणि समस्या सोडवण्याचे कौशल्य तपासतात. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक भावना निर्माण करणे आणि त्यांची बौद्धिक क्षमता वाढवणे,गणित,विज्ञान, इंग्रजी,कॉम्प्युटर आणि सामान्य ज्ञान ही ऑलिम्पियाड परीक्षेची प्रमुख उद्दिष्टे आहेत.या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांत आत्मविश्वास वाढतो, विश्लेषणात्मक कौशल्ये सुधारतात आणि भविष्यातील स्पर्धा परीक्षांसाठी पाया तयार होतो.या ऑलिम्पियाड परिक्षेत ज्ञानबोधिनी प्राथमिक विद्यालयात इयत्ता पहिलीत शिकत असलेल्या कु.अवनी अश्विन मोगरकर हीने सुवर्णपदक मिळवत यश संपादन केले आहे.याबद्दल तिचे कौतुक होत आहे.

# मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा; महाराष्ट्रातील 10 हजार गावांसाठी 'क्लायमेट प्रूफ' शेती

अहिल्यानगर: हवामानातील सतत होणारे बदल हे कृषी क्षेत्रासमोर मोठे आव्हान बनले असून त्याचा थेट परिणाम शेती उत्पादनावर होत आहे. या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे आवश्यक असल्याचे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. राज्य सरकार जागतिक बँकेच्या सहकार्याने राज्यातील १० हजार गावांमध्ये 'क्लायमेट प्रूफ' शेतीचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवणार असल्याची घोषणाही त्यांनी केली आहे.


राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या ३९ व्या पदवीप्रदान समारंभात ते बोलत होते. या कार्यक्रमाला राज्यपाल जिष्णू देव वर्मा अध्यक्षस्थानी उपस्थित होते.

हवामान बदलाशी जुळवून घेणाऱ्या शेतीची गरज मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, हवामानातील बदलामुळे पारंपरिक पद्धतीची शेती अधिक जोखमीची बनत आहे.

त्यामुळे कृषी संशोधन संस्थांनी बदलत्या वातावरणात टिकून राहणारी आणि स्थिर उत्पादन देणारी नवीन पीकवाणे विकसित करण्यावर भर द्यावा. तसेच शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, सिंचन व्यवस्था आणि हवामानानुसार शेती पद्धती याबाबत मार्गदर्शन देणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

# चला फिरा अरुणाचल प्रदेश

अरुणाचल प्रदेश हे भारत ईशान्येकडील एक लोकप्रिय पर्यटन आहे. येथील झिरो हे सर्वात महत्त्वाचे स्थळ आहे. देवांचे शहर म्हणून याची ख्याती आहे. याठिकाणी एका प्रेरणेपेक्षा काही कमी नाही, दृष्टीस पडेल त्या प्रत्येक कोपऱ्यात एक आश्चर्य आहे आणि अशा बेसुमार ठिकाणांमुळे, अनेकदा एखादा पर्याय सुटू शकतो. गोष्टी सोप्या करून देण्यासाठी, येथे अरुणाचल प्रदेशातील झिरोमधील उत्तम ठिकाणे दिली आहेत.






## दऱ्यातील सर्व मार्ग

अरुणाचल प्रदेशातील टॅली व्हॅली अभयारण्य अनेक पर्यटकांना आकर्षित करते. तो अनेक चिंताजनक प्रजातींचे घर आहे असे म्हणतात. हे ठिकाण ऑर्किड, सिल्व्हर ओक आणि फर्नसह अनेक वनस्पती आणि त्यांच्या प्रजातीने समृद्ध आहे. पाच हजार वर्षे जुन्या आणि बहुतेक १९६२ मध्ये शोध लावण्यात आलेल्या मेघना गुहा मंदिराला नक्की भेट द्या.


## टेकडी चढणे

भर दुपारच्या वेळी आपटनी खोऱ्यातील विखुरलेली ब्लू अल्पाइनची झाडे बिंदू आहेत. ट्रेकिंगसाठी बूट घाला आणि या जागेत मनसोक्त हुंदडा. टोकडीवरील झिरो पुटो म्हणून ओळखले जाणारे ठिकाण प्रशासकीय मूल्य आहे. आपाटनी खोऱ्यात एक नेत्रदीपक दृश्य यामुळे दिसते आहे. हापोलीला जिल्हा प्रशासकीय मुख्यालय वसलेले आहे.

## मासे पकडायला जा

टरिन माश्यांची शेती देवदार आणि बांबूच्या उपवनाच्या दरम्यान जवळ आहे. अनेक माशांचे येथे प्रजनन आहे. बांबूचे उपवन एक रोमांचक ठिकाण आहे. जे निळ्या अल्पाइननेयुक्त आहे आणि हायकिंग आणि लांब ट्रेकिंगसाठी अभ्यागतांना पर्याय देते. टिपी ऑर्किड रिसर्च सेंटरने उष्णदेशीय पाऊस वनामध्ये आसरा घेतलेला आणि हे ऑर्किडच्या सुमारे १००० प्रजातींचे घर आहे. यामुळे पिशव्या पॅक करून अरुणाचल प्रदेशाचे आश्चर्यकारक जग अनुभवण्यास तयार व्हा.

# दैत्यासूर धबधबा



आंबिवलीहून पुढे जामरूग गावाकडे जाणाऱ्या वाटेवरील पुलाच्या आधी उजवीकडे वळल्यावर आपण डुक्कर पाड्यात पोहोचतो. येथूनच पुढे अनेक खासगी फार्म हाऊसचे प्रकल्प आहेत. हे फार्म हाऊस ज्या डोंगराच्या पायथ्याशी बांधले आहेत त्या डोंगराच्या माथ्यावर एक नैसर्गिक भगदाड म्हणजेच नेढे असल्यामुळे याला नाखिंडाचा डोंगर असे स्थानिक संबोधतात. कोथळीगडाच्या मध्यावर असलेल्या पेठेची वाडी गावाच्या समांतर उंचीवर नाखिंडा डोंगरालाही पदर सुटला आहे. (स्थानिके भाषेतील पदर म्हणजे एका विशिष्ट उंचीवर डोंगराला समांतर असलेले विस्तीर्ण पठार) याच पदरावरून अनेक धबधबे रांगेत खाली कोसळत असतात. यातलाच सर्वात मोठा धबधबा म्हणजेच दैत्यासूर धबधबा. कातळ भिंतीवरून रांगेत कोसळणारे हे धबधबे सजावटीसाठी लावलेल्या बत्ताशांच्या माळांप्रमाणे भासतात. या धबधब्याच्या तळाशी जाण्यासाठी तासाभराची बिकट चढाई करावी लागते. अजस्त्र धबधब्याचे रौद्र भीषण रूप पाहणे हा वेगळा अनुभव असला तरी तेथे जाणं धोक्याचे आहे. कारण हा प्रपात खूप उंचावरून कोसळत असतो. बिकट चढाईचे श्रम घ्यायचे नसल्यास फार्म हाऊसच्या प्रोजेक्टच्या मागे दोनचार कमी प्रवाहाचे धबधबे आहेत. तेथे पोहोचणे सोपे असून येथे धबधब्या खाली भिजण्याचा आनंद घेता येतो.



## सोलान पाडा बंधारा

कर्जत रेल्वेस्थानकापासून अंदाजे ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या जामरूग गावाच्या पुढे सोलान पाडा नावाची छोटीशी वाडी आहे. या वाडीच्या पुढे डोंगर पायथ्याशी हल्लीच एक छोटासा बंधारा बांधण्यात आला. बंधाऱ्याचे अतिरिक्त पाणी वाहून जाण्यासाठी केलेल्या सांडव्याची टप्प्या टप्प्यात उतरत जाणारी अशी विशिष्ट पद्धतीची केलेली बांधणी पर्यटकांच्या लोंढ्याला कारणीभूत ठरत आहे. धरण भरले की अतिरिक्त पाणी लयबद्ध पद्धतीने एका टप्प्यावरून दुसऱ्यावर, दुसऱ्यावरून तिसऱ्या टप्प्यावर ओसंडून वाहू लागते आणि पाहणाऱ्याला एकावर एक असे अनेक धबधबे पहिल्याचा आनंद मिळतो. हे टप्पे जास्त खोल नसल्यामुळे येथे भिजण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी जमते. अर्थात ही गर्दी टाळून थोडसे मागे डोंगराजवळ जायला हरकत नाही. अगदीच डोंगरधारेला लागून असलेल्या या धरणाच्या जलाशयाच्या नयनरम्य देखाव्याला सुरेख जोड लाभली आहे ती पाठीशी उभ्या असलेल्या कातळ भिंतीवरून रांगेत कोसळणाऱ्या धबधब्यांची. नजर खिळवून ठेवणारा असाच हा नजारा म्हणावा लागेल. गेल्या दोन वर्षांपासून सोशल मीडियावरून होणाऱ्या मोठ्या प्रसिद्धीमुळे सुट्टीच्या दिवशी येथे हजारोंच्या संख्येने पर्यटक जमू लागले आहेत. त्यामुळेच सुट्टीचे दिवस टाळून मध्येच एखादी खास रजा काढून येथे आवूर्जन भेट द्यायला हरकत नाही.

# खडसांबळे लेणी

अष्टविनायकातील पाली गावापासून १४ किलोमीटर अंतरावर खडसांबळे नावाचे एक छोटेसे गाव आहे. याच गावाच्या पाठीमागे डोंगरात मध्यावर एक लेणी समूह कोरलेला आहे. चहू बाजूने जंगलाने वेढलेल्या या लेण्यांना भेट द्यायची झाल्यास गावातून वाटाड्या घेणे आवश्यक ठरते. गावापासून लेण्यांपर्यंत पोहोचायला तासाभराची सोपी चढाई करावी लागते. पण थोडे कष्ट घेऊन पठारावर पोहोचताच येथील हिरवाईने नटलेला निसर्ग पाहून घेतलेल्या श्रमाचे चीज होते. दूर दूरवर पसरलेले हिरवे गवताच्छादीत पठार, त्यापलीकडे गुटख्यापासून ते थेट हिरडीपर्यंत (गुटखा-हिरडी ही घाटमाथ्यावरील गावे आहेत) आडवी पसरलेली सह्यधार आणि त्यावरून मुसंडी मारून वाहणारे अनेक धबधबे असा नयनरम्य देखावा निरखत पुन्हा जंगलात शिरायचे आणि थेट लेणी गाठायची.



लेण्यांच्या समोर येताच विशेष लक्ष वेधून घेतो तो येथील विस्तीर्ण सभागृह. मात्र दरड कोसळून व छत खचून त्यातील बहुतांश गुहांचा प्रवेश बंद झाला आहे. डोंगरमाथ्यावरून ओघळणारे पाणी लेणींच्या थेट पुढ्यात कोसळते. श्रावणात येथे गेल्यास या पाण्यावर पडणाऱ्या तिरप्या सूर्यकिरणांमुळे पाण्यात एकात एक गुरफटलेली अनेक इंद्रधनुष्य पाहायला मिळतात. खडसांबळे लेण्यांची सफर एका अपरिचित वारसास्थळाची भेट आणि सुगम्य जंगल भटकंती असा दुहेरी आनंद देऊन जाते.

# विवाह सोहळ्यासाठी शाही ठिकाणे

प्रत्येकाच्या आयुष्यात विवाह सोहळा हा फार महत्त्वाचा असतो. तो चांगल्या पद्धतीने आणि चांगल्या ठिकाणी करणे ही सगळ्यांची इच्छा असते. तसेच हे क्षण आयुष्यभर आठवणीत राहतात. याला अधिकच रोमॅंटिक करण्यासाठी निवडा पुढील शाही ठिकाणे...

## शाही राजस्थान

ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्यामुळे राजस्थान नेहमीच शाही थाटासाठी ओळखला जातो. राज पॅलेस, राम बाघ पॅलेस आमी जय महाल पॅलेस येथे लग्न सोहळा तुमच्यासाठी अविस्मरणीय ठरू शकतो. उदयपूर येथील द लेक पॅलेस हॉटेल हा आणखी सर्वोत्तम ऑप्शन असू शकतो. राजस्थानमधील जयपूर, उदयपूर आणि जोधपूर ही शहरे देशातील प्रमुख शहरांशी रस्ते मार्गाने जोडली गेली आहेत.

## ॲडव्हेंचरस अंदमान

हिरवाईने नटलेला भूप्रदेश, स्वच्छ पाण्याचा अथांग समुद्र आणि सुंदर किनारा अशी पार्श्वभूमी लग्न सोहळ्यासाठी अतिशय उत्तम ठरू शकते. अंदमान-निकोबार बेटे एक सध्या भारताती उत्तम वेडिंग डेस्टिनेशन्सपैकी एक मानले जाते. ॲडव्हेंचरची हौस असणाऱ्या कपल्स ना येथे वॉटर स्पोर्टस्‌चा आनंद देखील घेता येऊ शकतो. येथे तुम्ही हवाई मार्गाने तसेच समुद्रमार्गे जहाजातून जावू शकता.



## हाऊसबोट

लग्न सोहळ्यासाठी समुद्र किनारा असलेले आणखी एक ठिकाण म्हणजे केरळ. तुम्हाला शांतता अनुभवायाची तर केरळ अतिशय सुंदर आहे. कोल्लम, कोटी आणि वरका येथील बॅकवॉटरमध्ये असलेल्या हाउस बोटमध्ये लग्न समारंभ संस्मरणीय ठरू शकते. येथे बस, कार, रेल्वे आणि विमानानेही जाऊ शकता.



# मिझोराम

मिझोराम हे ईशान्येकडील सात राज्यांतील एक छोटेसे राज्य. मिझोरामची राजधानी असलेले ऐझवाल हे गुवाहाटीपासून ५०६ कि.मी., शिलॉंगपासून ४५० कि.मी. आणि इम्फाळपासून ३७४ कि.मी. दूर आहे. सिलचर हे जवळचे रेल्वेस्थानक असून ते १८४ कि.मी. अंतरावर आहे. सर्व रस्ते सिलचरमार्गेच जातात. त्यामुळे रस्त्याने ऐजवाल गाठायला गुवाहाटीपासून दीड दिवस लागतो. गुवाहाटी व कोलकाता येथून विमानाने ऐझवालला येता येते.

मिझोराम हे हिरव्यागार डोंगररांगांनी व्यापलेले आहे. राज्याचे सर्वात उंच शिखर फावांगपुई (७०७५ फूट) हे म्यानमारच्या सीमेवर आहे. या डोंगररांगेला ब्ल्यू माउंटन म्हणून ओळखले जाते. राज्याची भाषा मिझो असल्याने येथील लोकांशी संपर्क साधताना भाषेची थोडी अडचण येते. मुख्य उत्पन्नाचे साधन शेती. तीही जंगल कापून काही काळासाठी करण्यात येते. येथे बांबूची लागवड मोठ्या प्रमाणात होत असल्याने दैनंदिन गरजांसाठी बांबूचा उपयोग मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे तेथे आपल्याला घरेही बांबूचीच पाहायला मिळतील. मिझो संस्कृतीतील दहा नृत्यप्रकारांपैकी चेराव म्हणजे बांबूनृत्य पर्यटकांसाठी पर्वणी असते. ऐजवालमधील झुलॉजिकल पार्क, म्युझियम प्रेक्षणीय आहे. तेथील बडा बाजार नावाची मुख्य बाजारपेठ प्रसिद्ध आहे. इथल्या हॉटेलांत चायनीजबरोबरच भात, भाकरी, वरण हमखास मिळते.

ऐझवालपासून ८५ किमीवर प्रेक्षणीय तामदिल तलाव, १५२ किमीवर ७५० फूट उंचीचा वांटावांग धबधबा व १३३ कि.मी.वर दाम्पा अभयारण्य आहे. ऐजवालहून खुंआंगचेरा गाव, तेथील छोटे भुयार, रेईक शिखर व तेथील मिझो पर्यटन ग्राम असा एक दिवसाचा गाडीने भटकंतीचा कार्यक्रम करता येतो. मिझोरामच्या भटकंतीसाठी ऑक्टोबर ते मार्च हा कालावधी उत्तम असतो. हे सीमावर्ती राज्य असल्याने येथे प्रवेशासाठी परवाना घ्यावा लागतो. हा परवाना दिल्ली, गुवाहाटी येथे मिझोराम सरकारच्या जनसंपर्क कार्यालयांबरोबरच ऐझवाल विमानतळावर मिळतो.

# मेघालय



मेघालय हे ईशान्येकडील राज्यांतील बांगलादेशच्या सीमेला लागून असलेले एक छोटेसे राज्य. नावाप्रमाणेच मेघांचा आलय असलेले सर्वाधिक पर्जन्यमानाचे राज्य. संपूर्ण मेघालय गारो, खासी व जैतिया टेकड्यांनी व्यापलेला आहे. या वेगवेगळ्या टेकड्यांच्या प्रदेशात राहणाऱ्या जमातीही या टेकड्यांच्याच नावाने म्हणजे गारो, खासी, जैतिया या नावाने ओळखल्या जातात. मेघालयातील बहुतांश लोकसंख्या ही या जमातींची आहे. सुमारे ३०० प्रकारचे ऑर्किड, दोन राष्ट्रीय उद्याने, अनेक प्रकारचे वन्य प्राणी यांनी समृद्ध असे हे राज्य आहे. येथील भटकंतीसाठी ऑक्टोबर ते एप्रिल हा कालावधी अनुकूल आहे. जून ते सप्टेंबर या दरम्यान येथे प्रचंड पाऊस असतो.

## शिलॉंग

गुवाहाटीपासून ९० किलोमीटरवर शिलॉंग हे मेघालयाच्या राजधानीचे शहर आहे. येथे सर्व शहरी सुविधा आहेत. प्रवासासाठी बस व जीप गाड्या यांची सेवा चांगली आहे. रस्तेही चांगले आहेत. शिलॉंगकडे जाताना १७ किलोमीटर अलीकडे, प्रचंड मोठा असा उमियाम जलाशय आहे. हा सर्व परिसर अत्यंत रम्य आहे. शिलॉंगपासून १० किलोमीटरवर शिलॉंग शिखर (६४४५ फूट) आहे. येथून शिलॉंग शहराचे विहंगम दृश्य पाहायला मिळते.

शहरापासून दहा- बारा किलोमीटरच्या परिसरात स्प्रेड इगल, स्वीट, एलेफंट अशा नावांचे धबधबे आहेत. शिलॉंगपासून ५४ कि.मी. अंतरावर चेरापुंजी येथून हिरव्या रंगाने नटलेल्या खोल दऱ्या, मोसमाई, दैन्थलेन, नोहकेलीकाई या नावाचे व असे अनेक धबधबे व बांगलादेशचा पठारी प्रदेश नजरेस पडतो. येथून ५५ किमीवर मोंहसिराम हे आता सर्वाधिक पर्जन्यमान असणारे ठिकाण म्हणून ओळखले जाते. याच पट्ट्यात दऱ्या-खोऱ्यांमध्ये लिविंग रुट ब्रिज हे नैसर्गिक आश्चर्य खास पाहण्याजोगे आहेत. ओढे, नाले ओलांडून जाण्यासाठी असे ३५ अवाढव्य पूल या परिसरात आहेत. खासी जमातीचा नोंगक्रेम सण व गारो जमातीचा वांगाला डान्स नोव्हेंबरमध्ये तर जैतियांचा बेह देन्खलाम सण जुलैमध्ये असतो.



## हजारो भुयारे

आपल्या देशात नैसर्गिक भुयारे फक्त मेघालय राज्यात आहेत. मेघालयाच्या टेकड्यांमध्ये असलेला चुनखडीचा खडक व सर्वाधिक पर्जन्यमान या घटकांमुळे मेघालयात हजारो भुयारांची निर्मिती झाली आहे. ही भुयारं भूगर्भ शास्त्रज्ञ व इतर अभ्यासकांसाठी नंदनवन म्हणावी लागतील. साहसाची व नित्य नव्याचा वेध घेण्याची ओढ असणाऱ्यांसाठी एक आव्हानच आहे. अशा या भुयारातून पृथ्वीच्या अंतरंगाचा वेध घेत केलेल्या साहसी मार्गक्रमणाला केव्हिंग संबोधले जाते. या केव्हिंगसाठी प्रस्तरारोहणाच्या तंत्राचा तर काही ठिकाणी वॉटर डायव्हिंग तंत्राचा वापर करावा लागतो. आतापर्यंत शोध घेतलेले सर्वात लांब भुयार ३१ कि.मी. लांबीचे आहे. नैसर्गिकरित्या या गुहांमध्ये तयार झालेल्या नानाविध रचना पाहताना आपण वेगळ्याच जगात आहोत की काय असा भास होतो. चेरापुंजीत मोसमाई नावाचे भुयार आहे. या भुयारातील मार्ग योग्य त्या सुविधा करून सोपा केलेला असल्याने पर्यटकांना या भुयाराची अनुभूती घेता येते.

# पावसाळी भटकंती

पावसाळा म्हटले की डोंगर, दऱ्या पादाक्रांत करण्यात भरपूर मजा येते. हिरव्या रंगाने नटलेले डोंगर पर्यटकांना खुणावत असतात. वीकेण्डला अशा पिकनिकची मजा लुटली की संपूर्ण आठवडा एकदम मस्त मूडमध्ये जातो. यासाठीच काही पर्यटनस्थळे..

## भिवगड

कर्जतपासून आठ किलोमीटरवरील गौरकामत गावाजवळ भिवगड/भीमगड नावाचा एक छोटा किल्ला आहे. अवघ्या अर्ध्या तासाच्या सोप्या चढाईने माथा गाठता येणाऱ्या या किल्ल्यावर पाण्याची काही टाकी, दगडी पायऱ्या आणि वाड्याचे चौथरेवगळता इतर वास्तू जवळजवळ नामशेष झाल्या आहेत. मात्र, गड-माथ्यावरून दिसणारा सभोवतालचा हिरवाकंच देखावा नजर खिळवून ठेवतो. हिरव्यागार शेतात डोक्यावर रंगीबेरंगी इरली घेऊन राबणारे शेतकरी, पाठीमागच्या ढाकच्या डोंगरावरील घनदाट वनराई, त्यातून कोसळणाऱ्या धबधब्यांच्या पांढऱ्या रेषा आणि अंग मोहरून टाकणारा गार वारा हे सारे अनुभवण्यासारखे आहे. हिरवाईच्या शौकिनांनी पावसाळ्यात आवर्जून भेट द्यावी असे हे ठिकाण. येथून जवळच एका खिंडीत मोठा धबधबा आहे. तास-दोन तासात गडफेरी आटोपून धबधब्यावर चिंब भिजण्याची मजा लुटता येऊ शकते.

## काळदुर्ग

माहीम-केळवे डोंगर रांगेतील पालघरजवळील एक छोटासा किल्ला म्हणजे काळदुर्ग. पालघर-मनोर गाडी रस्त्यादरम्यान लागणाऱ्या वाघोबाच्या खिंडीपासून सुरू होणारा घडीव पायरस्ता आपल्याला तासाभराच्या सोप्या चढाईने काळदुर्गावर घेऊन जातो. जंगल भटकंतीचा आनंद लुटत टप्प्याटप्प्याने चढणाऱ्या पायवाटेने डोंगरमाथा गाठल्यावर दृष्टीस पडणारा सभोवतालचा रम्य देखावा डोंगर चढाईचा शीण कुठल्या कुठे पळवून लावतो. सूर्या नदीचे विस्तीर्ण खोरे, सूर्या-वैतरणा संगम, क्षितिजाशी अरबी समुद्राची निळाई तर पलीकडे तांदूळवाडी किल्ल्यापर्यंत नागमोडी पसरलेली डोंगररांग. शहरी जीवनाचा विसर पाडायला लावणारे निसर्गसौंदर्य. वाघोबाच्या खिंडीतून येणारे वाहतुकीचे आवाजच काय ते आपण शहरात असल्याची जाणीव करून देतात. माथ्याच्या छोट्याशा विस्तारात ३-४ पाण्याची टाकी पाहायला मिळतात. बाकी अवशेष तसे फारसे काही शिल्लक नाहीत.



## खिरेश्वरचे नागेश्वर मंदिर

खळाळत वाहणारे असंख्य झरे, डोंगरदऱ्यात खोलवर उतरत जाणारे ढगांचे पुंजके, त्याआडून डोकावणारे सह्याद्रीचे कडे असे नजरेला भुरळ पडणारे निसर्गसौंदर्य भटक्यांना पावसाळ्यात माळशेज घाटात हमखास खेचून आणते. घाटातील गर्दी टाळून आवर्जून भेट द्यावे असे एक देखणे वास्तुशिल्प येथील खिरेश्वर गावी दडलेले आहे. हरिश्चंद्र गडाच्या पायथ्याचे गाव म्हणजे खिरेश्वर. घाट चढून आल्यावर काही अंतरावर लागणाऱ्या खुबी फाट्यावरून डावीकडे (मुंबईकडून नगरकडे जाताना) जाणाऱ्या कच्च्या रस्त्याने ४ किलोमीटरच्या अंतरावर वसलेले हे छोटेसे गाव. ही कच्ची सडक म्हणजे धरणाचा बंधारा होय. त्यामुळे उजवीकडे क्षितिजापर्यंत पसरलेल्या निळाईत आजूबाजूच्या डोंगरांचे पडलेले प्रतिबिंब पाहत असता आपण गावात कधी पोहोचतो हे समजतच नाही.



# मोहिली धबधबा

### कसे जाल ?

नाशिकहून कल्याणमार्गे कर्जतला जावे. कर्जत स्थानकावरून श्रीराम पुलावरून रिक्षाने मोहिलीकडे जाता येते. स्वतःचे वाहन असेल तर अधिक सोयीचे .

पावसाळ्यात उंच डोंगरमाथ्यावरून कोसळणारे पांढरेशुभ्र धबधबे पाहणे हे पर्यटकांसाठी एक अविस्मरणीय अनुभव असतो. कर्जत तालुक्याला निसर्गाने मोहिली धबधबा हे देणे दिले आहे. मोहिली धबधबा हा कर्जत पासून ६ ते ७ कि.मी. लांब आहे. उल्हास नदी पार करून प्रत्यक्ष मोहिलीत प्रवेश होतो. डोंगरावरून भिरभिरणारा वारा , हिरवीगार वनराई, तेथून दिसणारा आजूबाजूचा निसर्ग असे नयनरम्य दृश्य डोळ्यांत साठवून ठेवावे असे वाटते . डोंगरमाथ्यावरून मुंबई-पुणे रेल्वेचा रस्ताही दिसतो . धबधब्याजवळ पर्यटकांची हॉटेल्स आहेत. मोहिली धबध्ब्याजवळ थंड वातावरणात गरमगरम वाफाळता चहा आणि मक्याची कणसे खाण्याची मजाच काही औरच आहे असे इथे येणारे पर्यटक सांगतात. यापुढे ७-८ किलोमीटर दूर गेल्यास कोंडाणा परिसरातही अनेक धबधबे आहेत .

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

## बाल मराठी संमेलनाचा उत्साह शिगेला ; नवी मुंबईतील रॅलीत शेकडो विद्यार्थ्यांचा सहभाग नीलम सामंत यांचा खास सहभाग



**नवी मुंबई** : नवी मुंबईमध्ये आयोजित करण्यात आलेल्या बाल मराठी संमेलनाचा उत्साह सध्या शिगेला पोहोचला आहे. मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने आज नवी मुंबईत भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये शेकडो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

नवी मुंबईतील वाशी येथील प्रदर्शन केंद्रात आज आणि उद्या अशा दोन दिवसांच्या बाल मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाच्या पार्श्वभूमीवर मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार व्हावा या उद्देशाने विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली.

या रॅलीमध्ये मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्या पत्नी नीलम सामंत यांचा विशेष सहभाग होता. शेकडो विद्यार्थी, शिक्षक आणि मराठीप्रेमींनी या रॅलीत सहभागी होत मराठी भाषेबद्दलचा अभिमान व्यक्त केला.

यावेळी बोलताना नीलम सामंत यांनी नवी मुंबईकरांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल आभार मानले. तसेच मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार जगभर व्हावा यासाठी राज्य सरकार आणि मराठी भाषा विभागाच्या वतीने सातत्याने विविध उपक्रम राबवले जातील, असेही त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांमधील हा उत्साह पाहून आनंद झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

## शिक्षण अधिकाऱ्यांच्या आडमुठपणामुळे शिक्षकांची पेन्शन रखडली ; सेवानिवृत्त शिक्षक आर्थिक संकटात – सूर्यकांत जोगदंड

**बीड (प्रतिनिधी)**



शासनाच्या स्पष्ट निर्देशानुसार सेवानिवृत्त शिक्षकांची पेन्शन दर महिन्याच्या एक तारखेलाच वितरित करणे बंधनकारक असताना, बीड जिल्ह्यात मात्र प्रशासनाच्या हलगर्जीपणा आणि आडमुठ्या कारभारामुळे अनेक शिक्षकांना अद्याप पेन्शन मिळालेली नाही. परिणामी जिल्ह्यातील वयोवृद्ध सेवानिवृत्त शिक्षक आर्थिक संकटात सापडले असून त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पेन्शनचे बजेट १८ फेब्रुवारी रोजी उपलब्ध झाले होते, मात्र प्रभारी शिक्षणाधिकारी श्रीमती कुवर यांच्या टेबलवर पेन्शनची फाईल तब्बल आठ दिवस पडून राहिली. या काळात संबंधित फाईलवर स्वाक्षरी करण्यात आली नसल्याने शिक्षकांची पेन्शन प्रक्रिया ठप्प झाली. याबाबत शिक्षकांनी विचारणा केली असता त्यांच्याशी अरेरावी केल्याचाही आरोप पुढे येत आहे.

या प्रकरणी माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) यांच्याकडे तक्रार करण्यात आली असली, तरी अद्याप संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही किंवा त्यांचा पदभार काढण्यात आलेला नाही, अशी नाराजी शिक्षक संघटनांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, १६ मार्च उलटून गेला तरीही शिक्षकांची पेन्शन वितरित झालेली नाही, ही बाब अत्यंत गंभीर मानली जात आहे. एकीकडे शिक्षणाधिकारी विविध दौरे करत असताना दुसरीकडे सेवानिवृत्त शिक्षक मात्र आर्थिक विवंचनेत दिवस काढत आहेत.

पेन्शन न मिळाल्यामुळे अनेक वयोवृद्ध शिक्षकांना औषधोपचार, बँकेचे हप्ते, घरगुती खर्च तसेच मुलांच्या शिक्षणासाठी पैसे उभे करण्याची कसरत करावी लागत आहे. सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरू असल्याने ईदचा खर्चही वाढलेला असून त्यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक ताण निर्माण झाला आहे. या गंभीर परिस्थितीबाबत कास्ट्राईब संघटना व इतर कर्मचारी संघटनांनी वरिष्ठांकडे लेखी तक्रारी केल्या आहेत. प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी तसेच सेवानिवृत्त शिक्षकांची पेन्शन तातडीने वितरित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा सर्व सेवानिवृत्त कर्मचारी संघटनांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# पाच विश्वविजेत्या संघांचा एकाच मंचावर गौरव; शुभमन-स्मृती ठरले सर्वोत्कृष्ट

**नवी दिल्ली**: भारतीय क्रिकेटच्या इतिहासात १५ मार्च २०२६ हा दिवस सुवर्ण अक्षरांनी लिहिला गेला. निमित्त होते नवी दिल्ली येथे पार पडलेल्या 'बीसीसीआय नमन पुरस्कार' सोहळ्याचे. यंदाचा हा सोहळा केवळ वैयक्तिक कामगिरीचा गौरव करणारा नव्हता, तर भारतीय क्रिकेटच्या जागतिक वर्चस्वावर शिक्कामोर्तब करणारा ठरला. या ऐतिहासिक कार्यक्रमात एकाच वेळी पाच आयसीसी (ICC) ट्रॉफी विजेत्या संघांचा सन्मान करण्यात आला, जे जागतिक क्रिकेटमध्ये प्रथमच घडले आहे.





### ■ विश्वविजेत्यांचा शाही सन्मान

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) यंदाच्या सोहळ्यात एक आगळावेगळा विक्रम प्रस्थापित केला. नुकताच टी-२० विश्वचषक २०२६ जिंकणारा वरिष्ठ पुरुष संघ, २०२५ चा चॅम्पियन्स ट्रॉफी विजेता संघ, २०२५ चा महिला एकदिवसीय विश्वचषक जिंकणारा संघ आणि १९ वर्षांखालील मुला-मुलींच्या विश्वविजेत्या संघांना एकाच मंचावर गौरवण्यात आले.

या पाचही संघांच्या अभूतपूर्व यशाने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. भारतीय क्रिकेटची ही 'सुवर्ण पिढी' असल्याची भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केली.शुभमन गिल आणि स्मृती मानधना यांची मोहोरवैयक्तिक कामगिरीमध्ये 'प्रिन्स' शुभमन गिल याने आपली छाप कायम ठेवली आहे. त्याला २०२५-२६ या वर्षातील सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय पुरुष क्रिकेटपटूचा मानाचा 'पॉली उमरीगर पुरस्कार' देऊन गौरवण्यात आले. तर महिला क्रिकेटमध्ये स्मृती मानधनाने आपल्या बॅटने पुन्हा एकदा जागतिक स्तरावर वर्चस्व गाजवत सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय महिला क्रिकेटपटूचा किताब पटकावला.

### ■ द्रविड, बिन्नी आणि मिताली राज यांना 'जीवनगौरव'

भारतीय क्रिकेटला शिखरावर पोहोचवण्यात मोलाचे योगदान देणाऱ्या दिग्गज खेळाडूंचा 'जीवनगौरव' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. भारतीय संघाचे माजी प्रशिक्षक आणि दिग्गज फलंदाज राहुल द्रविड तसेच बीसीसीआयचे अध्यक्ष रॉजर बिन्नी यांना 'कर्नल सी. के. नायडू जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तसेच, महिला क्रिकेटची ओळख बदलणाऱ्या मिताली राज हिला महिलांमधील जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या तिन्ही दिग्गजांच्या योगदानामुळेच आजचे भारतीय क्रिकेट समृद्ध झाले असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### ■ देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबईचा डंका

आंतरराष्ट्रीय यशासोबतच देशांतर्गत क्रिकेटमधील कामगिरीचीही दखल घेण्यात आली. देशांतर्गत क्रिकेटची 'पंढरी' मानल्या जाणाऱ्या मुंबई क्रिकेट असोसिएशनला (MCA) सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संघाचा पुरस्कार मिळाला. वैयक्तिक स्तरावर आयुष म्हात्रे आणि हर्ष दुबे यांसारख्या युवा खेळाडूंनी आपल्या चमकदार कामगिरीच्या जोरावर पुरस्कारांवर नाव कोरले, जे भारतीय क्रिकेटचे भविष्य सुरक्षित असल्याचे संकेत देत आहेत. एकूणच, बीसीसीआयचा हा पुरस्कार सोहळा म्हणजे केवळ कौतुक सोहळा नसून, भारतीय क्रिकेटच्या अतुलनीय प्रवासाचा आणि भविष्यातील स्वप्नांचा हुंकार ठरला आहे.

### ■ प्रमुख वैयक्तिक पुरस्कार

सर्वोत्कृष्ट पुरुष आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू (पॉली उमरीगर पुरस्कार): शुभमन गिल

सर्वोत्कृष्ट महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू: स्मृती मानधना (कारकिर्दीतील पाचव्यांदा)

कर्नल सी. के. नायडू जीवनगौरव पुरस्कार (पुरुष): राहुल द्रविड आणि रॉजर बिन्नी

बीसीसीआय जीवनगौरव पुरस्कार (महिला): मिताली राज

सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय पदार्पण (पुरुष): हर्षित राणा

सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय पदार्पण (महिला): एन. श्री चरणी

संघांचा विशेष सन्मान (५ विश्वविजेते संघ)

या सोहळ्यात पाच भारतीय संघांचा ऐतिहासिक सन्मान करण्यात आला: १. वरिष्ठ पुरुष संघ: टी-२० विश्वचषक २०२६ विजेते२. वरिष्ठ पुरुष संघ: चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ विजेते३. वरिष्ठ महिला संघ: महिला एकदिवसीय विश्वचषक २०२५ विजेते४. १९ वर्षांखालील मुले: विश्वचषक २०२६ विजेते५. १९ वर्षांखालील मुली: विश्वचषक २०२५ विजेते

### ■ देशांतर्गत क्रिकेट पुरस्कार (२०२४-२५ हंगाम)

सर्वोत्कृष्ट देशांतर्गत संघ: मुंबई क्रिकेट असोसिएशन (MCA)

लाला अमरनाथ पुरस्कार (रणजी ट्रॉफी सर्वोत्तम अष्टपैलू): हर्ष दुबे (विदर्भ)

लाला अमरनाथ पुरस्कार (मर्यादित षटकांचे सर्वोत्तम अष्टपैलू): आयुष म्हात्रे (मुंबई)

माधवराव सिंधिया पुरस्कार (रणजी ट्रॉफी सर्वाधिक धावा): वाय. व्ही. राठोड (विदर्भ)

माधवराव सिंधिया पुरस्कार (रणजी ट्रॉफी सर्वाधिक बळी): सुचित जे. (नागालँड - प्लेट ग्रुप)

जगमोहन दालमिया ट्रॉफी (सर्वोत्कृष्ट महिला क्रिकेटपटू - वरिष्ठ): शेफाली वर्मा (हरियाणा)

जगमोहन दालमिया ट्रॉफी (सर्वोत्कृष्ट महिला क्रिकेटपटू - कनिष्ठ): इरा जाधव (मुंबई)

सर्वोत्कृष्ट पंच (देशांतर्गत क्रिकेट): उल्हास गांधी

युवा आणि कनिष्ठ स्तरावरील पुरस्कार

एम. ए. चिदंबरम ट्रॉफी (U-23 सी. के. नायडू ट्रॉफी सर्वाधिक बळी): विकी ओस्तवाल (महाराष्ट्र)

एम. ए. चिदंबरम ट्रॉफी (U-19 कूच बिहार ट्रॉफी सर्वाधिक धावा): नित्य जे. पंड्या (बडोदा)

जगमोहन दालमिया ट्रॉफी (U-16 विजय मर्चंट ट्रॉफी सर्वाधिक धावा): शंतनू सिंग (उत्तर प्रदेश)

# भारतीय महिला हॉकी संघाला वर्ल्डकपचे तिकीट विश्वचषकासाठी पात्र ठरत रचला इतिहास

**हैदराबाद**: भारतीय महिला हॉकी संघाने आपल्या जिद्दीच्या जोरावर २०२६ च्या 'एफआयएच' (FIH) महिला हॉकी विश्वचषकाचे तिकीट निश्चित केले आहे. हैदराबाद येथे पार पडलेल्या पात्रता फेरीच्या अंतिम सामन्यात धडक मारत भारतीय महिलांनी हे यश संपादन केले. अंतिम सामन्यात जरी भारतीय संघाला इंग्लंडकडून ०-२ अशा फरकाने पराभवाचा सामना करावा लागला असला, तरी उपविजेतेपद मिळवून त्यांनी विश्वचषकातील आपले स्थान पक्के केले आहे. नेदरलँड्स आणि बेल्जियम येथे संयुक्तपणे आयोजित होणाऱ्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत आता भारतीय वाघिणी आपला दरारा निर्माण करण्यासाठी सज्ज झाल्या आहेत.



या पात्रता फेरीतील भारताचा प्रवास अत्यंत रोमहर्षक राहिला. उपांत्य फेरीच्या अत्यंत महत्त्वाच्या सामन्यात भारतीय महिलांनी इटलीच्या संघावर मात करत अंतिम फेरीत प्रवेश मिळवला होता. नियमानुसार, या पात्रता फेरीच्या अंतिम फेरीत पोहोचणाऱ्या संघांना विश्वचषकाचे थेट प्रवेशद्वार खुले होणार होते. त्यामुळे इटलीविरुद्धचा विजय हा भारतीय संघासाठी विश्वचषकाची दारे उघडणारा ठरला. अंतिम सामन्यात इंग्लंडच्या संघाने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला आणि भारताला गोल करण्याची संधी दिली नाही. इंग्लंडने दोन गोल नोंदवत विजय मिळवला असला, तरी भारतीय बचावफळीने दिलेली झुंज कौतुकास्पद ठरली.

२०२६ चा महिला हॉकी विश्वचषक नेदरलँड्स आणि बेल्जियम या दोन देशांत खेळवला जाणार आहे. जागतिक स्तरावरील या सर्वात मोठ्या स्पर्धेत स्थान मिळवणे हे भारतीय महिला हॉकीच्या प्रगतीचे लक्षण मानले जात आहे. हैदराबादमधील स्थानिक प्रेक्षकांनीही भारतीय संघाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून पाठिंबा दिला. आता विश्वचषकाचे मुख्य लक्ष्य समोर ठेवून भारतीय संघ आपला सराव आणि रणनीती अधिक मजबूत करण्यावर भर देणार आहे. प्रशिक्षकांनी या कामगिरीवर समाधान व्यक्त केले असून, इंग्लंडविरुद्धच्या पराभवातून बोध घेऊन विश्वचषकात अधिक जोमाने उतरण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# ग्रामीण शिक्षणाचा निस्वार्थ दीपस्तंभ : शंकर खारगे गुरुजी

महाराष्ट्राचे महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव व सुप्रसिद्ध सनदी अधिकारी श्री विकास खारगे यांना घडविणारे त्यांचे वडील श्री शंकर खारगे यांच्या "अक्षरयात्री" या पुस्तकाच्या प्रकाशनाचा समारंभ नुकताच कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी येथे एका कौटुंबिक वातावरणात संपन्न झाला. ९६ वर्षीय ज्येष्ठ शिक्षक शंकर गोविंद खारगे यांच्या जीवनकार्यावर आधारित बापूजी :अक्षरयात्री समाजसेवक हे शीर्षक असलेल्या या पुस्तकाची ई–पीडीएफ मिशन आयएएस चे संचालक प्रा. डॉ.

नरेशचंद्र काठोळे यांच्यामार्फत माझ्या हातात पडली आणि ती मी पूर्ण वाचून काढली.

वाचताना एका साध्या पण विलक्षण कार्य करणाऱ्या शिक्षकाचा दीर्घ प्रवास डोळ्यासमोर उभा राहतो. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेपासून सुरू झालेला आणि आजपर्यंत पोहोचलेला हा प्रवास या पुस्तकातून अतिशय संवेदनशील शब्दबंधात मांडला आहे.

शंकर गोविंद खारगे मास्तर, ज्यांना अनेकजण प्रेमाने बापूजी म्हणून ओळखतात, यांनी आयुष्यभर शिक्षणाच्या माध्यमातून समाजसेवा केली. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी, ज्ञानाची ज्योत प्रत्येक घरापर्यंत पोहोचावी, या ध्येयाने त्यांनी शिक्षक म्हणून आपले संपूर्ण आयुष्य समाजाला अर्पण केले.

त्या काळात सांगली, सातारा आणि कोल्हापूर परिसरातील अनेक खेड्यांमध्ये शिक्षणाची परिस्थिती अत्यंत मर्यादित होती. शाळांची संख्या कमी, शिक्षकांची कमतरता आणि शिक्षणाबद्दल जागृतीही कमी

होती. तेव्हा १९४८-४९ च्या काळात आजूबाजूच्या लहान खेड्यामधून अंधश्रद्धा प्रचंड बोकाळली होती. शिक्षण घेतले की शहाणपण येते यापेक्षा शिकून मुले बिघडतात, धर्म बुडवतात,संस्कार विसरतात अशाच समजूतींचा पगडा जास्त असायचा याशिवाय मुलांना



शाळेत पाठविण्यापेक्षा घरच्या कामात त्याला गुंतवावे जेणेकरून चार पैसे वाचतील हा विचार त्यावेळी समाजात असायचा अशा विपरीत परिस्थितीत खारगे मास्तरांनी गावोगावी फिरून लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

मुलांना शाळेत आणणे, पालकांना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगणे आणि समाजात ज्ञानाची ज्योत पेटवणे हेच त्यांच्या आयुष्याचे ध्येय बनले.

त्यांनी जवळपास ३० वर्षे पगारी शिक्षक म्हणून सेवा केली, परंतु त्यांची सेवा केवळ नोकरीपुरती मर्यादित नव्हती. निवृत्तीनंतरही त्यांनी शिक्षणासाठी काम करणे थांबवले नाही. पुढील ४५ वर्षे त्यांनी समाजशिक्षणाचे विनामूल्य कार्य केले. अशा प्रकारे जवळपास ७५ वर्षे त्यांनी शिक्षणसेवेसाठी अर्पण केली, जे कोणत्याही शिक्षकासाठी अत्यंत प्रेरणादायी उदाहरण आहे.

खारगे मास्तरांचे आयुष्य साधेपणाने भरलेले होते. घर सांभाळणारी पत्नी रुख्मिणी. खारगे मास्तरांची सावली म्हणूनच ओळखली जायची. मास्तरांनी आपल्या शिक्षकी पेशात प्रसिद्धी किंवा मान-सन्मानाची अपेक्षा न ठेवता हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण दिले. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा मिळाली आणि अनेक कुटुंबांमध्ये शिक्षणाची परंपरा निर्माण झाली.

या खारगे मास्तरांच्या महान जीवनकार्याचा गौरव करण्यासाठी त्यांच्या जीवनावर आधारित "अक्षरयात्री समाजसेवक " या पुस्तकाचे कौटुंबिक सोहळ्यात प्रकाशन नुकतेच करण्यात आले. खारगे मास्तरांच्या जीवनप्रवासाचे जतन करण्यासाठी अनेक व्यक्तींनी सहकार्य केले. त्यामध्ये शिक्षण संस्थांशी संबंधित पदाधिकारी, शिक्षक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जुनी महिती, आठवणी आणि छायाचित्रे जतन करण्यास मदत केली. त्यांच्या कुटुंबियांनी उद्धव साहेब, अशोक साहेब, माणिक साहेब, विजय साहेब, विकास खारगे साहेब, बापू तारदाळकर सर, राजा कदम सर, मनोज तांबे सर, उदय कुलकर्णी सर यांनीही या स्मरण यात्रेत महत्वाची भूमिका बजावली.या प्रसंगी अमरावतीचे डॉ. नरेशचंद्र काठोळे , संचालक मिशन आय ए एस यांनी स्वतः इचलकरंजी येथे जाऊन शंकर खारगे उर्फ बापूजी यांना मिशन आय ए एस तर्फे सन्मानपत्र बहाल केले आणि त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या. हा प्रसंग खारगे मास्तरांच्या दीर्घ आणि निस्वार्थ शिक्षणसेवेचा गौरव करणारा ठरला.

आज शिक्षणाच्या क्षेत्रात आधुनिक साधने, तंत्रज्ञान आणि सुविधा उपलब्ध आहेत. तरीही खारगे मास्तरांनी ज्या निष्ठेने आणि समर्पणाने शिक्षणाची सेवा केली, ती प्रेरणा आजही प्रत्येक शिक्षकासाठी मार्गदर्शक आहे.

शिक्षकाचे कार्य केवळ वर्गात धडा शिकविण्यापुरते मर्यादित नसून समाजाला दिशा देण्याचे महान कार्य आहे, हे त्यांनी आपल्या आयुष्यभराच्या कार्यातून सिद्ध करून दाखविले.

म्हणूनच समाजाने त्यांना सन्मानाने "अक्षरयात्री समाजसेवक शंकर खारगे" ही उपाधी दिली. त्यांनी पेटविलेली शिक्षणाची ज्योत आजही असंख्य विद्यार्थ्यांच्या आयुष्यात प्रकाश पसरवित आहे.

थोर तत्ववेत्ता अल्बर्ट आईन्स्टाइन म्हणतो की, शाळेत शिकलेल्या गोष्टी विसरल्यानंतर जे उरते ते म्हणजे शिक्षण होय.तीच पाऊलवाट खारगे मास्तरांनी निवडली.

ज्ञानाच्या सेवेत आयुष्य अर्पण करणाऱ्या या थोर शिक्षकाला समाजाचा हा कृतज्ञतेचा सलाम.त्याचबरोबर शंकर गोविंद खारगे नऊ अक्षरांचे मालक. शिकणे आणि शिकविणे एवढाच उद्योग केला. कुटुंबाचा सांभाळ केला. समाजाचे हित साधले. देण्यासारखे सर्व दिले. सर्वांचे प्रेम मिळविले. आयुष्याचे सार्थक झाले. शिक्षणाची मास्टरकी(चाबी)

हाती आल्याशिवाय आयुष्यात यशाचे दरवाजे उघडणार नाहीत हे ओळखून अखंडपणे मास्तरकीत रमलेल्या एका समाज शिक्षकाची आणि एका निःस्वार्थ दीपस्तंभाची ही गोष्ट आहे.

**रवींद्र दांडगे**
**जनसंपर्क अधिकारी**
**मिशन आय ए एस**
**अमरावती**
**9404545238**



# एका दिवसात हजारो नागरिकांच्या समस्या मार्गी; काळी (दौलत) समाधान शिबिर ठरले यशस्वी ; 2800 लाभार्थ्यांना घेतला लाभ

**महागाव | प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर अभियान – टप्पा १' अंतर्गत महागाव तालुक्यातील काळी (दौलत) ग्रामपंचायत येथे आयोजित करण्यात आलेले समाधान शिबिर उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीरीत्या पार पडले. नागरिकांच्या समस्यांचे त्वरित निराकरण करण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेल्या या शिबिरात सुमारे ३२०० नागरिकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला, तर त्यापैकी २८०० नागरिकांना विविध शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यात आला.

या शिबिराच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार अभय मस्के होते. यावेळी नायब तहसीलदार गजानन पराते, वनपरिक्षेत्र अधिकारी सम्राट मेश्राम, मंडळ अधिकारी गोविंद ठाकरे, सचिन फटाले यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शिबिरादरम्यान महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित फेरफार प्रकरणे, ७/१२ व ८अ उताऱ्यांतील त्रुटी दुरुस्ती, अभिलेख दुरुस्ती आदी कामांसह उत्पन्न, रहिवासी, जात व क्रीमीलेअर प्रमाणपत्रे, विविध सामाजिक योजना तसेच इतर शासकीय सेवांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. 'वन डे सर्व्हिस'च्या माध्यमातून अनेक नागरिकांच्या समस्या त्याच दिवशी मार्गी लागल्याने शिबिरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी अध्यक्षीय भाषणात तहसीलदार अभय मस्के यांनी नागरिकांनी शिबिराला दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त केले. शासनाच्या विविध योजना थेट नागरिकांपर्यंत पोहोचविणे आणि त्यांच्या समस्या तात्काळ सोडविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशासनाने केलेल्या प्रयत्नांमुळे अनेक नागरिकांची कामे तत्काळ मार्गी लागल्याने उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात समाधान व्यक्त करत प्रशासनाचे आभार मानले.

या शिबिरामुळे शासनाच्या सेवांचा लाभ नागरिकांपर्यंत अधिक जलद आणि पारदर्शक पद्धतीने पोहोचविण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेल्याची भावना उपस्थितांमधून व्यक्त होत होती.

# महागावात कनिष्ठ अभियंता यांच्यावर लाच मागणी व धमकीचे आरोप; पोलीस ठाण्यात तक्रार

**प्रतिनिधी | महागाव**

पंचायत समिती सभागृह दुरुस्तीच्या कामाच्या बिलासंदर्भात १० हजार रुपयांची मागणी करून शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप करत महागाव येथील शासकीय ठेकेदार अरबाजखान कयुमखान पठाण यांनी जि.प. बांधकाम उपविभाग महागाव येथील कनिष्ठ अभियंता प्रवीण मनोहरराव सलामे यांच्या विरोधात महागाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणामुळे बांधकाम विभागात खळबळ उडाली आहे.

तक्रारीनुसार, पंचायत समिती सभागृह दुरुस्तीच्या विकासकामाचे बिल मंजूर करण्यासाठी सलामे यांनी १० हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे. पैसे न दिल्यास बिलातील रक्कम सुमारे अडीच लाख रुपयांनी कमी करण्याची धमकी दिल्याचेही तक्रारदाराने म्हटले आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी अर्जदाराच्या घरी जाऊन त्याच्या वडिलांनाही पैसे देण्यास सांगितल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले असून त्या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असल्याचा दावा करण्यात आला आहे.



तसेच १३ मार्च २०२६ रोजी रात्री ८ ते १० वाजण्याच्या दरम्यान वारंवार फोन करून अश्लील शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या संभाषणाचे ऑडिओ रेकॉर्डिंग उपलब्ध असल्याचे तक्रारदाराने सांगितले आहे. याशिवाय खोट्या अॅट्रॉसिटी प्रकरणात अडकविण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, यापूर्वीही सुमारे महिनाभरापूर्वी संबंधित अधिकाऱ्याने कार्यालयातील एका कर्मचाऱ्याला व्हिडिओ कॉलद्वारे तलवार दाखवून धमकी दिल्याचा प्रकार घडल्याचा आरोप आहे. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केल्यामुळे त्याचे वाईट परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी देण्यात आल्याचेही सांगण्यात आले आहे.

दरम्यान, महागाव येथे गेल्या जवळपास दहा वर्षांपासून प्रवीण सलामे कार्यरत असून विविध कामांमध्ये अनियमितता व भ्रष्टाचाराचे आरोप वेळोवेळी समोर आले असल्याची चर्चा स्थानिक स्तरावर सुरू आहे. घाणमुख येथील कामांमधील कथित गैरप्रकार, धारगाव येथील रस्त्याच्या कामासंदर्भातील तक्रारी तसेच वाकोडी येथील कामांमधील तफावत याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. तरीदेखील त्यांची बदली न झाल्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

स्थानिक स्तरावर काही कर्मचाऱ्यांमध्येही असंतोष असल्याचे बोलले जात असून, संबंधित अधिकारी नेहमी मद्यधुंद अवस्थेत कामकाज करतात व कर्मचाऱ्यांवर दबाव टाकतात, असेही आरोप काहींनी केले आहेत.

या संदर्भात तक्रारदाराने जिल्हा परिषद यवतमाळचे मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अभियंता, उपविभागीय अभियंता तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक यांना प्रतिलिपी पाठवून संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, या प्रकरणी महागाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# मिशन आयएएसतर्फे आयएएस झालेल्या रेणुकाचा सत्कार संपन्न



**अमरावती :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी योग्य मार्गदर्शनाखाली सातत्याने नियोजनबद्ध पद्धतीने अभ्यास केला तर ती मुले हमखास स्पर्धा परीक्षेमध्ये यशस्वी होऊ शकतात असे उद्गार यावर्षीच्या आयएएस परीक्षेमध्ये यशस्वी झालेल्या अकोला जिल्ह्यातील पातूर येथील कुमारी केतन दिनेशराव केकन हिने पातुर येथे काढले. तिने आयएएसच्या परीक्षेत यश संपादन केल्यानंतर व पुण्यावरून ती पातुरला परत आल्यानंतर मिशन आयएएसचे संस्थापक प्रा.डॉ. नरेशचंद्र काठोळे व अकोल्याचे मिशन आयएएसचे विभागीय संचालक व सुप्रसिद्ध उद्योजक श्री रुपेश राठी यांनी तिच्या घरी जाऊन तिला सन्मानपत्र देऊन तिचा आयएएसच्या परीक्षेमध्ये यश प्राप्त केल्याबद्दल गौरव केला. त्याचबरोबर तिचे वडील व जिल्हा परिषद अध्यापक श्री दिनेशराव केकन यांचा व तिच्या मातोश्री सौ शोभाताई यांचा देखील बुके देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी पातूर येथील गोरक्षण केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण बोरकर गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री अरुण भाऊ काकड पुरुषोत्तम घुगे गजानन केकन संजय केकन राजेंद्र घुगे अजयकुमार नागरे सुशील कुमार सांगळे व सुनील भाऊ राख हे उपस्थित होते

कुमारी रेणुका केकन हिचे शिक्षण अकोला जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये झाले असून तिचे बारावीपर्यंतचे शिक्षण अकोला जिल्ह्यातील पातूर येथील कावल कनिष्ठ महाविद्यालयातून पूर्ण केले आहे. त्यानंतर तिने फर्ग्युसन कॉलेजमधून पदवी परीक्षा उत्तीर्ण करून स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी जळगावच्या दीपस्तंभ ह्या सुप्रसिद्ध संस्थेमध्ये प्रवेश घेतला. त्या ठिकाणी संस्थेचे संस्थापक श्री यजुर्वेद महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली तिने स्पर्धा परीक्षेचा अभ्यास पूर्ण केला. दीपस्तंभमध्ये योग्य मार्गदर्शन मिळाल्यामुळे व त्या ठिकाणी वेळोवेळी आलेल्या सनदी व राजपत्रित अधिकाऱ्यांनी योग्य मार्गदर्शन केल्यामुळे आपण हे यश संपादन करू शकलो असे तिने यावेळी सांगितले.

मी लहान असताना माझ्या वडिलांनी मला सतत प्रेरणा दिली. ते मला नेहमी म्हणायचे की तुझी सही घेण्यासाठी रांग लागली पाहिजे. त्यांच्या या प्रेरणेमुळे मी शालेय जीवनात असतानाच स्पर्धा परीक्षेच्या दृष्टिकोनातून माझ्या अभ्यासाची आखणी केली होती. त्यामुळे मी अल्पावधीमध्ये हे यश प्राप्त करू शकले. तिच्या या यशामुळे संपूर्ण पातूर शहरात आनंदाचे वातावरण पसरले असून पुण्यावरून ती पातुरला येतात गावकऱ्यांनी तिची मिरवणूक काढली. चौका चौकात तिच्या स्वागतासाठी तिचे भव्य छायाचित्र असलेले फलक लागलेले होते. पातूर परिसरातील लोकांनी तिचे अभिनंदन करण्यासाठी तिच्या घरी गर्दी केली होती. ग्रामीण भागात राहून व ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिक्षण घेऊन रेणुका ने यश संपादन करून स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या मुलांसमोर एक आदर्श ठेवला आहे.

**- प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे**
**संचालक, मिशन आयएएस**
**अमरावती कॅम्प**

# रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांची मुंबईत भेट; पुरुषोत्तम (गोटू )वीर यांना लवकरच मोठी जबाबदारी?

**मुंबई :** राजगृहाशी एकनिष्ठ राहून सामाजिक व राजकीय कार्यात सक्रिय असलेले पुरुषोत्तम (गोटू )वीर यांनी आज मुंबई येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनात येये रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांची भेट घेतली.

या भेटीदरम्यान पक्षाचे नेते विजय साळवे यांच्या उपस्थितीत पक्ष संघटन अधिक मजबूत करणे, पक्षाचा विस्तार वाढवणे तसेच आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका ताकदीने लढवण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी पक्षाच्या पुढील वाटचालीसंदर्भात विविध विषयांवर सकारात्मक संवाद झाला. तसेच पुरुषोत्तम वीर यांना लवकरच रिपब्लिकन सेनेत महत्त्वाची जबाबदारी देण्यात येणार असल्याची चर्चा देखील या बैठकीत झाली. या प्रसंगी लक्ष्मण गव्हाणे, अशोक वाघमारे, बी. एस. जगतकर यांच्यासह पक्षाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.



# माँसाहेब जिजाऊंच्या विचारांनी प्रेरित महिलांसाठी विशेष स्पर्धा उत्साहात संपन्न





**परळी/ प्रतिनिधी**

स्त्रीशक्ती, संस्कार आणि नेतृत्वगुणांची प्रेरणा देणाऱ्या माँसाहेब जिजाऊ यांच्या विचारांचा जागर प्रसार व्हावा आणि महिलांमध्ये आत्मविश्वास व कर्तृत्वाची जाणीव अधिक दृढ व्हावी या उद्देशाने महिलांसाठी आयोजित करण्यात आलेली विशेष स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक मूल्यांचा संगम घडवून आणणारा हा कार्यक्रम महिलांसाठी प्रेरणादायी ठरला. जागतिक महिला दिनानिमित्ताने परळी येथे 'कोण ठरणार परळीची माँसाहेब जिजाऊ' या विशेष स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे आयोजन माऊंट लिटरा झी स्कूल, बचपन प्ले स्कूल, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अकॅडमी आणि क्रिएटिव्ह किड्स एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात माँसाहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. जिजाऊंच्या आदर्श जीवनकार्याची आठवण करून देत महिलांनी समाजनिर्मितीत आपली भूमिका अधिक प्रभावीपणे पार पाडावी, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. स्पर्धेमध्ये विविध वयोगटातील महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. रांगोळी स्पर्धा, कथा, प्रश्नमंजुषा, कलात्मक सादरीकरण, व्यक्तिमत्त्व विकासाशी संबंधित उपक्रम तसेच सांस्कृतिक स्पर्धांमधून सहभागी महिलांनी आपले कौशल्य आणि सर्जनशीलता प्रभावीपणे सादर केली.

विशेष म्हणजे, स्पर्धेत सहभागी झालेल्या महिलांनी जिजाऊंच्या विचारांना साजेशी कल्पकता आणि सामाजिक भान आपल्या कलाकृतींमधून व्यक्त केले. रंगीबेरंगी रांगोळ्या, प्रेरणादायी संदेश आणि स्त्रीशक्तीचे प्रतीक दर्शविणाऱ्या कलाकृतींनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. स्पर्धेच्या माध्यमातून महिलांना स्वतःची कला सादर करण्याची संधी मिळालीच, शिवाय परस्परांमध्ये संवाद, सहकार्य आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे सहभागी महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि आनंदी वातावरण. उपस्थितांनी महिलांच्या आत्मविश्वासपूर्ण सहभागाचे कौतुक करत अशा उपक्रमांची समाजाला मोठी गरज असल्याचे मत व्यक्त केले. महिलांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा स्पर्धा नियमितपणे आयोजित व्हाव्यात, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे अध्यक्ष सुप्रसिद्ध डॉ. हरिश्चंद्र वंगे दादा यांचे मार्गदर्शन लाभले. माजी प्राचार्य रामेश्वर बांगड, उपाध्यक्ष प्रा. कैलास घुगे, प्राचार्य मंगेश काशीद सर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रम सुरळीत पार पाडला. नियोजनबद्ध व्यवस्थापन आणि सर्वांच्या सहकार्यामुळे संपूर्ण कार्यक्रम खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला.

लवकरच या स्पर्धेतील पंधरा विजेत्यांना आकर्षक पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. सहभागी सर्व महिलांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. या सन्मानामुळे महिलांमध्ये नवचैतन्य आणि प्रेरणा निर्माण होऊन सुसंस्कारित समाज घडविण्यासाठी मदत होईल.

एकूणच, माँसाहेब जिजाऊ यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारा आणि स्त्रीशक्तीला नवी दिशा देणारा हा कार्यक्रम सामाजिक बांधिलकी जपत महिलांच्या क्षमतांना वाव देणारा ठरला. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून येण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

